**साक्षीदार क्र. १**

**मी याव्दारे प्रतिज्ञेपुर्वक निवेदन करतो की,**

**नाव : बाळासाहेब गोरक्षनाथ आढाव,**

**वय : ५२ वर्ष, धंदा: शेती,**

**रा. केंदळ खुर्द, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर**

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्रीमती एम. के. सोनवणे यांचेमार्फत सुरु :**

दि. २८/०६/२०२४ रोजी पोलिसांनी मला बोलविले नव्हते. मी माझ्या कामासाठी पोलिस स्टेशनला गेलो होतो. पोलिसांनी माझी को-या कागदावर सही घेतली. माझी सही पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र. २ वर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकुर मला माहिती नाही. सबब, सहीस **निशाणी १५** देण्यात येते.

**साक्षीदार सरकार पक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे सरकार पक्ष उलटतपास घेण्याची परवानगी मागतात, परवानगी देण्यात येते.**

हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०६/२०२४ रोजी पोलिस कॉन्स्टेबल अडकित्ते यांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी घोडेगाव ते सोनई जाणा-या रोडवर बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटनास्थळ हे घोडेगाव ते सोनई जाणा-या रोडवर घोडेगाव ग्रामपंचायत विहीरीजवळ अरुंद पुलाजवळ होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटनास्थळ हे मला सोपान पांडुरंग आव्हाड यांनी दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटनास्थळ हे दहा फुट रुंदीचा डांबरी रस्ता होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनास्थळी मला काचा पडलेल्या दिसल्या. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनास्थळाच्या उत्तर बाजुस रस्त्यालगत ओढा होता. हे म्हणणे खरे नाही की, दक्षिण बाजुस मोकळी जागा होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा घटनास्थळ पंचनामा पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला, तो मला वाचुन दाखविला आणि मग मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनास्थळ पंचनामा होत असताना माझ्या सोबत दुसरे पंच नामे मंजाबापु मारोती तांबे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण,**

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ ॲड. श्री. ए. टी. आगळे यांचे मार्फत नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.08.25 15:22:08 +0530

दिनांक :- २५/०८/२०२५

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.